महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ५६ /२०२४ दि. २८/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **कोपरी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत रेल्वे यार्ड कोपरी सर्कल ते महादेव मंदिर दरम्यान वळण रस्त्यावरील पिलरवर स्टीलचे गर्डर ठेवण्यात येणार आहे. सदर वेळी कोपरी सर्कल ते सारस्वत बँक सिध्दार्थनगर दरम्यान दोन्ही वाहिन्यांवरील संपूर्ण वाहतूक बंद करावी लागणार आहे. ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व हासिजा कॉर्नर ते कोपरी सर्कल दरम्यान टीएमटी व खाजगी बसेस, रिक्षा व इतर हलकी वाहने जात असल्याने मोठया प्रमाणात वाहनांची वर्दळ होत असते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) मुंबई कडून आनंदनगर चेकनाका सर्व्हिस रोड मार्गे ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोपरी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कोपरी सर्कल येथून उजवे वळण घेवून फॉरेस्ट नाका – ठाणेकरवाडी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) तीन हात नाका व टेलिफोन नाका कडून भास्कर कट मार्गे कोपरी सर्कल कडून ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोपरी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कोपरी सर्कल येथून उजवे वळण घेवून फॉरेस्ट नाका मार्गे सर्व्हिस रोडने इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व कडून सिध्दार्थनगर मार्गे कोपरी सर्कल कडे जाणाऱ्या हलक्या वाहनांना **सिध्दार्थनगर येथील सारस्वत बँकेजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने हासिजा कॉर्नर – भाजी मार्केट – ठाणेकरवाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व कडून सिध्दार्थनगर मार्गे कोपरी सर्कल कडे जाणाऱ्या जड अवजड वाहनांना **सिध्दार्थनगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मंगला हायस्कूल – जुने कोपरी पोलीस स्टेशन– कन्हैयानगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

१) दि. २९/०३/२०२४ रोजी रात्री २३:०० ते दि. ३०/०३/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजेपावेतो
२) दि. ३०/०३/२०२४ रोजी रात्रौ २३:०० ते दि. ३१/०३/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजेपावेतो
३) दि. ३१/०३/२०२४ रोजी रात्रौ २३:०० ते दि. ०१/०४/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजेपावेतो

सदर वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान **गर्डर** टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी** :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.